**मुंबई, दि.१९ जानेवारी, २०१६**

## माजी मंत्री डॉ.दौलतराव आहेर यांच्या निधनामुळे मी एका ज्येष्ठ सहकाऱ्याला मुकलो

## -कृषी मंत्री एकनाथराव खडसे

**मुंबई , दि.१९ जानेवारी**-राज्याचे माजी आरोग्य मंत्री डॉ.दौलतराव आहेर यांच्या निधनामुळे मी माझ्या एका ज्येष्ठ सहकाऱ्याला कायमचा मुकलो आहे. डॉ.आहेर यांचे निधन धक्कादायक आणि मनाला चटका लावणारे आहे , अशा शब्दात राज्याचे कृषी मंत्री एकनाथराव खडसे यांनी डॉ.आहेर यांच्या दु:खद निधनाबद्दल आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत.

भाजपा-सेना युतीचे सरकार राज्यात असतांना १९९५ ते १९९९ या काळात डॉ.दौलतराव आहेर यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य , अन्न व औषध प्रशासन , वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये इत्यादी खाती समर्थपणे सांभाळून या विभागावर आपली छाप उमटविली , असे नमूद करुन आपल्या शोक संदेशात खडसे यांनी पुढे म्हटले आहे की , महाराष्ट्रात आरोग्य विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी तसेच गोरगरिबांसाठी जीवनदायी आरोग्य योजना स्थापन करण्यात त्यांनी दिलेले योगदान कधीही विसरता येणार नाही. राज्यातील जिल्हा रुग्णालयांचे काळानुरुप आधुनिकीकरण करण्यासाठी त्यांनी आपल्या मंत्री काळात जागतिक बँकेकडून १०० कोटी रुपयांचा निधी मिळविला होता. राज्यातील शेती आणि शेतकऱ्यांना नदयांचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून नदी जोड प्रकल्पासाठी त्यांनी नेहमी आग्रही भूमिका घेतली. आपल्या मतदारसंघात त्यांनी स्वच्छता अभियान राबवून सार्वजनिक स्वच्छतेचा एक आदर्श घालून दिला. आदिवासी भागात बालकांच्या कुपोषणावर मात करण्यासाठी डॉ.आहेर यांनी राबविलेली मातृत्व अनुदान योजना आदिवासी मातांसाठी वरदान ठरली. नाशिक विभागाच्या विकासाकरीता त्यांनी फार मोठे योगदान दिले.

१९८० पासून महाराष्ट्राच्या राजकारणात असलेल्या डॉ.दौलतराव आहेर यांच्या निधनामुळे भारतीय जनता पक्षात निर्माण झालेली पोकळी कधीही भरुन येणार नाही. मी शोकाकुल अशा आहेर परिवारांच्या दु:खात सहभागी आहे. ईश्वर मृताच्या आत्म्यास सद्गती देवो , हीच ईश चरणी प्रार्थना , असे खडसे यांनी आपल्या शोक संदेशात शेवटी म्हटले आहे.

***********************************